Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ तर्फे, मडकोना येथे रासेयो शिबीराचे उदघाटन

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळचे वतीने सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत ग्राम मडकोना येथे सात दिवशीय शिबीराचे आयोजित करण्यात आले आहे. या विशेष शिबीराचे उद्घाटन दि. १८ डिसेंबर २०१९ रोजी डॉ. राजेंद्र देशमुख, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे हस्ते संपन्न झाला. सदर शिबीर दि. १८/१२/२०१९ ते दि. २४/१२/२०१९ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. डॉ. राजेंद्र देशमुख यांनी शारिरिक व मानसिक स्वास्थ राहण्याकरिता विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच तंबाखु निर्मुलन, पाणी बचत व स्वच्छता शिबीरादरम्यान ठेवावी असे आवाहन केले.

सदर रा.से.यो. शिबीराच्या उदघाटन कार्यक्रमाच्या वेळी प्रा. अंजली गहरवार यांनी विद्यार्थ्यांना शिबीरादरम्यान शिस्तबध्दरितीने श्रमदानाची कामे करावीत. शेतकऱ्यांशी समरस जाणून घ्याव्या आणि ते निरसन करण्यासाठी तज्ञाकडून मार्गदर्शन करून घेण्याचे आवाहन केले.

प्रत्यक्ष मडकोना येथे दि. १९/१२/२०१९ ला ग्रामवासींच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डि. पार्लावार यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे आणि पूर्ण सेवाभावी वृत्ती ठेवून शिबीर यशस्वी करण्यासाठी उधुक्त केले. कार्यक्रमात यवतमाळ विभागाचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. कैलास वानखडे यांनी विद्यार्थ्यांना संकुचित वृत्तीतून बाहेर येवून पूर्ण आत्मविश्वासाने कोणतेही कार्य कसे साध्य करता येईल या विषयी मार्गदर्शन केले. उपस्थितांना कृषिचे महत्व पटवून दिले आणि नानाजी देशमुख यांनी कृषि संजीवनी योजने विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मडकोना ग्राम पंचायतीच्या उपाध्यक्ष श्रीमती नखाते यांनी महिलांकरिता विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करावे असे मत व्यक्त केले.

सात दिवशीय कार्यक्रमामध्ये रासेयो शिबीरामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे दैनंदीन कार्यक्रम श्रमदान, गटचर्चा, किर्तन, पथनाटये, वृक्षदिंडी, स्वच्छता संदेश व अभियान, किटकनाशकांचा सुरक्षित वापर, मशरूम उत्पादन तंत्रज्ञान कार्यशाळा, महीला सक्षमीकरण उदबोधन, रेशीम शेती तंत्रज्ञान कार्यशाळा, घरचे घरी बियाणे उत्पादन, मधुमक्षीका पालन तंत्रज्ञान कार्यशाळा, स्त्रिरोगनिदान व उपचार शिबीर, रक्तदान शिबीर, माती परिक्षण व योगाभ्यास तसेच निरनिराळे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाकरिता उपस्थितांचे आभार कु. सोनाली शिरस्कर हिने मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता प्रा. धिरज वसुले, डॉ. प्रशांत शिंगोटे, रासेयो कार्यक्रम अधिकारी, डॉ. रविंद्र सातभाई, श्री, मंगेश शेटे, सहायक कुलसचिव, डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, महाविद्यालयातील संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी तसेच मडकोना या गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचे सहाकार्य लाभले.